# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

मुक्त व दूरस्थ अध्ययन प्रशाळा

आय.डी.एस. इमारत
सेट गेस्ट हाउसशेजारी,
आयुका मार्ग,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
दूरध्वनी 02025622385/6/7

**डॉ. वैभव जाधव**
संचालक
(अतिरिक्त कार्यभार)

**दिनांक ३०/०७/२०२१**

## नवीन प्रवेशाबाबत सूचना

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे बी.ए., बी.कॉम., एम.ए. व एम.कॉम. हे अभ्यासक्रम मुक्त व दूरस्थ अध्ययन प्रशाळेअंतर्गत **दूरस्थ शिक्षण** (बहिस्थ नव्हे) पद्धतीने चालविले जातात.

विद्यापीठ अनुदान आयोगाकडून प्राप्त सूचनांनुसार "**दूरस्थ शिक्षण**" पद्धतीने प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठीचे शैक्षणिक सत्र **नोव्हेंबर २०२१**पासून सुरु होईल आणि प्रवेशाची अंतिम तारीख १५ डिसेंबर २०२१ असेल.

नोव्हेंबर २०२१ पासून सुरु होणाऱ्या शैक्षणिक सत्रासाठीची **प्रवेश सूचना** दि. १ सप्टेंबर २०२१ नंतर www.unipune.ac.in/sol या संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यात येईल.

नोव्हेंबर २०२१ सत्रामधील प्रवेशासाठीचा पुढील तपशील:

- उपलब्ध असणारे विषय
- अभ्यासक्रम आणि अध्ययनाचे माध्यम
- प्रवेश प्रक्रियेचा तपशील
- प्रवेशासाठी आवश्यक पात्रता
- प्रवेश शुल्क रचना
- अभ्यास केंद्र यादी

इ. सर्व तपशील **प्रवेश सूचना** प्रदर्शित करतेवेळी संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येणार आहे, याची सर्व विद्यार्थ्यांनी कृपया नोंद घ्यावी.

# <u>पदवी स्तरावरील प्रवेशासाठी आवश्यक कागदपत्रे:</u>

- इयत्ता १२वी / पदविका / व्यवसाय प्रमाणपत्र परीक्षेचे गुणपत्रक
- विद्यार्थ्याच्या नावात बदल असल्यास त्यासंदर्भात कागदपत्र
- स्थानांतर प्रमाणपत्र किंवा स्थलांतर प्रमाणपत्र (यापैकी एक - जे लागू असेल ते)

अ) महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माधामिक शिक्षण मंडळातून इयत्ता १२वीची परीक्षा नियमित (Regular) विद्यार्थी म्हणून उत्तीर्ण असल्यास <u>स्थानांतर प्रमाणपत्र</u> (शाळा / महाविद्यालय सोडल्याचा दाखला) (LC) आवश्यक असेल.
यापूर्वी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयात / विद्यापीठ विभागात प्रवेश घेतला असल्यास त्या महाविद्यालयाने / विभागाने दिलेले स्थानांतर प्रमाणपत्र (Transfer Certificate)

ब) स्थलांतर प्रमाणपत्र (<u>Migration Certificate</u>) पुढील विद्यार्थ्यांसाठी आवश्यक असेल:

i) महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माधामिक शिक्षण मंडळातून इयत्ता १२वीची परीक्षा <u>बहि:स्थ / खाजगी</u> विद्यार्थी म्हणून उत्तीर्ण असल्यास

ii) महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माधामिक शिक्षण मंडळाव्यतिरिक्त <u>इतर शिक्षण मंडळातून</u> उच्च माध्यमिक प्रमाणपत्र / पदविका / व्यवसाय प्रमाणपत्र परीक्षा उतीर्ण असल्यास जसे की

1. महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ
2. महाराष्ट्र राज्य व्यवसाय शिक्षण परीक्षा मंडळ
3. राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्षण परिषद
4. राष्ट्रीय मुक्त विद्यालयीन शिक्षण संस्था (एन.आय.ओ.एस.)
5. केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळ (सी.बी.एस.ई.)
6. काउन्सिल ऑफ इंडियन स्कूल सर्टिफिकेट एक्झॅमिनेशन (सी.आय.एस.सी.ई.)
7. अन्य राज्यातील शिक्षण मंडळ
8. आंतरराष्ट्रीय शिक्षण मंडळ जसे की केंब्रिज असेसमेंट इंटरनॅशनल एज्युकेशन (सी.ए.आय.ई.), इंटरनॅशनल बॅकलॉरिएट (आय.बी.) इ.

iii) यापूर्वी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाव्यतिरिक्त इतर विद्यापीठात / इतर विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयात प्रवेश घेतला असल्यास त्या विद्यापीठाने दिलेले स्थलांतर प्रमाणपत्र (Migration Certificate)

- शासनाकडून वेळोवेळी प्राप्त होणाऱ्या सूचनांनुसार इतर आवश्यक कागदपत्रे

<u>पदव्युत्तर स्तरावरील प्रवेशासाठी आवश्यक कागदपत्रे:</u>

- पदवी परीक्षेचे गुणपत्रक
- विद्यार्थ्याच्या नावात बदल असल्यास त्यासंदर्भात कागदपत्र
- स्थानांतर प्रमाणपत्र किंवा स्थलांतर प्रमाणपत्र (यापैकी एक - जे लागू असेल ते)

१) यापूर्वी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयात / विद्यापीठ विभागात / बहि:स्थ विभागात प्रवेश घेतला असल्यास त्या महाविद्यालयाने / विभागाने दिलेले स्थानांतर प्रमाणपत्र (Transfer Certificate)

२) यापूर्वी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाव्यतिरिक्त इतर विद्यापीठात / इतर विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयात प्रवेश घेतला असल्यास त्या विद्यापीठाने दिलेले स्थलांतर प्रमाणपत्र (Migration Certificate)

- शासनाकडून वेळोवेळी प्राप्त होणाऱ्या सूचनांनुसार इतर आवश्यक कागदपत्रे

**संचालक,**
**मुक्त व दूरस्थ अध्ययन प्रशाळा**